महा मेट्रो
PUNE METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (पुणे मेट्रो रेल प्रकल्प)

---

## पुणे मेट्रोच्या रामवाडी मेट्रो स्थानक ते वर्ल्ड ट्रेड सेंटर आणि ईओएन आयटी पार्क-खराडी या मार्गावर पुणे मेट्रो आणि पीएमपीएमएल यांच्या समन्वयातून बस सेवेचा शुभारंभ





पुणे मेट्रोच्या पिंपरी चिंचवड मनपा स्थानक ते जिल्हा न्यायालय मेट्रो स्थानक आणि वनाझ मेट्रो स्थानक ते रामवाडी मेट्रो स्थानक या २९ किमी मार्गांवर मेट्रो सेवा पूर्ण क्षमतेने सुरु आहे. रामवाडी मेट्रो स्थानक परिसरातील अनेक शैक्षणिक संस्था, आयटी पार्क, पुणे विमानतळ, विशेष आर्थिक क्षेत्र आणि रहिवासी क्षेत्र यांना जोडते. या भागात कामासाठी येणारे आणि या भागातून शहरात इतरत्र कामासाठी जाणारे नागरिक पुणे मेट्रोचा मोठ्याप्रमाणावर वापर करित आहेत. या स्थानकावर येणाऱ्या नागरिकांसाठी पुणे मेट्रो आणि पीएमपीएमएल यांच्या सहभागातून आज

दिनांक १९ जुन २०२४, बुधवार रोजीपासून रामवाडी मेट्रो स्थानक ते डब्लूटीसी आणि ईओएन आयटी पार्क-खराडी या मार्गावर फिडर बस सेवा सुरु करण्यात आली आहे.

या फिडर बस सेवेमुळे या मार्गांवरील शैक्षणिक संस्था, आयटी पार्क, पुणे विमानतळ, विशेष आर्थिक क्षेत्र आणि रहिवासी क्षेत्र सार्वजनिक वाहतुकीने जोडले जाणार आहे. या ७ किमी मार्गावर १७-२० बस थांबे असून दर ३० मिनिटांच्या वारंवारितेने दोन बस असणार आहेत. सकाळी ७.३० मिनिटे ते रात्री ९.३० मिनिटे अशी हि बस सेवा आठवड्याचे सातही दिवस सुरु असणार आहे. हि बस रामवाडी मेट्रो स्थानक, वडगाव शेरी, विमाननगर, चंदन नगर, खराडी बायपास, जनकबाबा दर्गा, सिल्व्हर चौक, राघोजी चव्हाण चौक, वर्ल्ड ट्रेड सेंटर गेट ३ व ५, ईओएन आयटी पार्क फेज १, गेरा टॉवर्स, गेरा वित्तीय झोन, आणि ईओएन आयटी पार्क फेज २ या मार्गानी प्रवास करणार आहे. या बस सेवेचे तिकीट रामवाडी स्थानकापासूनच्या अंतराच्या नुसार अनुक्रमे ५ रु, १० रु, आणि १५ रु असणार आहे. प्रवाश्यांची मागणी आणि मिळणार प्रतिसाद यावर सेवेची वारंवारिता पुढे ठरविण्यात येणार आहे.

हा नवीन सेवा मार्ग कमीत कमी अंतर आणि वेळ, रस्त्यांची सद्य स्थिती, कमीत कमी बस थांबे, परिसरात राहणाऱ्या नागरिकांची घनता आणि या भागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या यांचे सर्वेक्षण करून बनविण्यात आला आहे. या फिडर बससेवेचा शुभारंभ पीएमपीएमलचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय कोलते (भा.प्र.से) यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. या कार्यक्रमास महामेट्रोचे संचालक विनोद कुमार अग्रवाल (संचालन व प्रणाली), कार्यकारी संचालक डॉ. हेमंत सोनवणे (प्रशासन/ जनसंपर्क), महाव्यवस्थापक कॅप्टन राजेंद्र सनेर पाटील (मानव संसाधन), वरिष्ठ उप महाव्यवस्थापक सुजित कानडे (प्रशासन/ जनसंपर्क), उप महाव्यवस्थापक मनोज कुमार डॅनिअल (मल्टी मोडल इंटिग्रेशन) आदी उपस्थित होते आणि पंचशील ग्रुप तर्फे ग्रुपचे उपाध्यक्ष विजितसिंग थोपटे आणि महाव्यवस्थापक मीनल भाटी या उपस्थित होत्या.

या प्रसंगी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर (भा.प्र.से) यांनी म्हंटले आहे की, "या फीडर बस सेवेमुळे चंदननगर, विमाननगर, खराडी या भागातील रहिवास्यांना आणि तसेच या भागातील आयटी पार्क मध्ये काम करणाऱ्या कमर्चाऱ्यांना रामवाडी मेट्रो स्थानकात येण्यासाठी व नियोजित स्थळी जाणे सोपे होणार आहे. 'फस्ट टू लास्ट माईल कनेक्टिव्हिटी' निर्माण करणेसाठी आणि सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहान देण्यासाठी हे एक महत्वाचे नियोजन ठरणार आहे."

## <u>या फिडर बस सेवेची मुख्य उद्दिष्टे:</u>

१. पुणे मेट्रोच्या प्रवाश्याना एकात्मिक वाहतूक आराखड्यानुसार सेवा देणे आणि 'फस्ट टू लास्ट माईल कनेक्टिव्हिटी' निर्माण करणे.


२. सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवणे.

३. पुणे मेट्रोच्या प्रवासी संख्या वाढविणे

४. कार्बन फूटप्रिंट आणि प्रदूषण पातळी कमी करणे

५. खाजगी वाहनाचा वापर कमी करून गर्दी कमी करणे

## <u>या फिडर बस सेवेबद्दल अधिकची माहिती पुढील तक्त्यांमध्ये आहे:</u>



| Metro Integrated Employee Feeder Bus Services - Ramwadi Metro Station - WTC & EON IT Park - Kharadi | | |
|---|---|---|
| S. No. | Feeder Bus Operation Information | |
| 1 | No. of Feeder Bus deployment | 2 Nos. (June 2024) |
| 2 | Type of Bus (PMPML) | 12 Mtr. E-Bus (A/C) |
| 3 | Capacity of the Bus | Max of 40 Passengers |
| 4 | Bus Fare (One Way) | Rs. 5/- & Rs. 10/- & Rs.15/- (Based on the Distance from Ramwadi Metro Staion & EON IT Park - Phase-2) |
| 5 | Service Timings | First Bus Service at 7.30 Hrs. – Last Bus Service at 21.30 Hrs. |
| 6 | Frequency | 30 Minutes with 2 buses. |
| 7 | Distance | 7 Kms. |
| 8 | Travel Time (One-way - Peak Hours) | 30 Minutes. |
| 9 | Nos. Bus Stops (en-route) | 17 - 20 Nos. including the Origin & Destination |



महा मेट्रो

PUNE METRO

PMPML



# Metro Integrated Feeder Bus Services

## Ramwadi Metro Station ⟷ WTC & EON IT Park – Kharadi

## Metro Feeder Bus Route, Bus-Stops & Fare Chart

| Bus Stop No. | Bus Stop Name | Distance from Ramwadi Metro Station (KMs) | Fare (Rs.) PP |
|---|---|---|---|
| 1 | Ramwadi Metro Station | 0.00 | 0.00 |
| 2 | Vadgaon Sheri Phata | 0.50 | 5.00 |
| 3 | Viman Nagar Corner | 1.30 | 5.00 |
| 4 | 5 Wa Mile | 1.70 | 5.00 |
| 5 | Tata Gaurdroom | 2.30 | 5.00 |
| 6 | Chandan Nagar | 2.80 | 10.00 |
| 7 | Kharadi By-pass | 3.50 | 10.00 |
| 8 | Janakbaba Darga | 3.80 | 10.00 |
| 9 | Downtown Chowk | 4.30 | 10.00 |
| 10 | Clover Galleria Chowk | 4.70 | 10.00 |
| 11 | Raghoji Chavan Chowk | 5.10 | 10.00 |
| 12 | WTC Main Gate No. 3 | 5.30 | 10.00 |
| 13 | WTC Main Gate No. 5 | 5.70 | 10.00 |
| 14 | EON IT Park – Phase- 1 (Main Gate) | 6.10 | 15.00 |
| 15 | Gera Towers | 6.50 | 15.00 |
| 16 | Gera Commerce Zone Junction | 6.80 | 15.00 |
| 17 | EON IT Park – Phase-2 | 7.10 | 15.00 |

| Bus Stop No. | Bus Stop Name | Distance from EON IT Park (KMs) | Fare(Rs.) PP |
|---|---|---|---|
| 1 | EON IT Park – Phase-2 | 0.00 | 0.00 |
| 2 | Gera Commerce Zone Junction | 0.30 | 5.00 |
| 3 | Gera Towers | 0.60 | 5.00 |
| 4 | EON IT Park – Phase- 1 (Main Gate) | 1.00 | 5.00 |
| 5 | WTC Main Gate No. 5 | 1.40 | 5.00 |
| 6 | WTC Main Gate No. 3 | 1.80 | 10.00 |
| 7 | Raghoji Chavan Chowk | 2.00 | 10.00 |
| 8 | Clover Galleria Chowk | 2.40 | 10.00 |
| 9 | Downtown Chowk | 2.80 | 10.00 |
| 10 | Janakbaba Darga | 3.30 | 10.00 |
| 11 | Kharadi By-pass | 4.00 | 10.00 |
| 12 | Chandan Nagar | 4.50 | 10.00 |
| 13 | Tata Gaurdroom | 5.00 | 10.00 |
| 14 | 5 Wa Mile | 5.60 | 15.00 |
| 15 | Viman Nagar Corner | 6.00 | 15.00 |
| 16 | Hyat Residency | 6.60 | 15.00 |
| 17 | Weikfield IT Park | 7.40 | 15.00 |
| 18 | Sakore Nagar | 7.60 | 15.00 |
| 19 | Nexa Showroom | 7.90 | 15.00 |
| 20 | Ramwadi Metro Station | 8.80 | 15.00 |

## Bus Services (Time Table)

| From Ramwadi Metro Staion | | | | From EON IT Park - 2 | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Bus - A | | Bus - B | | Bus - A | | Bus - B | |
| Feeder Bus No. | Bus Departure Time (Hrs.) | Feeder Bus No. | Bus Departure Time (Hrs.) | Feeder Bus No. | Bus Departure Time (Hrs.) | Feeder Bus No. | Bus Departure Time (Hrs.) |
| A | 7.30 | B | 8.00 | A | 8.00 | B | 8.30 |
| A | 8.30 | B | 9.00 | A | 9.00 | B | 9.30 |
| A | 9.30 | B | 10.00 | A | 10.00 | B | 10.30 |
| A | 10.30 | B | 11.00 | A | 11.00 | B | 12.00 |
| A | 12.00 | B | 12.30 | A | 12.30 | B | 13.00 |
| A | 13.00 | B | 13.30 | A | 13.30 | | |
| Break - Shift Change - 13.30 Hrs. to 16.00 Hrs. | | | | | | | |
| A | 16.00 | B | 16.30 | A | 16.30 | B | 17.00 |
| A | 17.00 | B | 17.30 | A | 17.30 | B | 18.00 |
| A | 18.00 | B | 18.30 | A | 18.30 | B | 19.00 |
| A | 19.00 | B | 19.30 | A | 20.00 | B | 20.30 |
| A | 20.30 | B | 21.00 | A | 21.00 | B | 21.30 |
| A | 21.30 | B | 22.00 | | | | |

| Feeder Bus Services | |
|---|---|
| First Bus from Ramwadi Metro Station - **7.30 Hrs.** | Last Bus from EON IT Park - Phase-2 - **21.30 Hrs.** |
| Bus Frequency - **Every 30 min** | |

# Helpline No.: 020 - 24-54-54-54